# परिपत्रक

**विषय : सन २०१४-१५ साठी विविध केंद्र/राज्य पुरस्कृत योजनांतर्गत पुरवठा करावयाच्या जैविक खतांचे दर निश्चित करणेबाबत.**

**संदर्भ :** दिनांक : १६ मे २०१४ रोजी आयोजित निविष्ठा विक्रीदर निश्चिती समितीची सभा.

सन २०१४-१५ मध्ये कृषि विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध केंद्र व राज्य पुरस्कत योजना अंतर्गत शेतक-यांना पुरवठा करावयाच्या निविष्ठांचे दर निश्चित करण्यासाठी दिनांक १६ मे २०१४ रोजी सभा संपन्न झाली. सदर सभेत सन २०१४-१५ साठी जैविक खतांचे दर निश्चित करण्यात आले असून त्याचा सविस्तर तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | जैविक खताचे नांव (घनरुप) | परिमाण (पॅकिंग साईजनिहाय दर रुपये सर्व करासहीत तालुका स्तरावर पोहोच) | | |
|---|---|---|---|---|
| | | २५० ग्रॅम | ५०० ग्रॅम | १००० ग्रॅम |
| १ | पीएसबी | ११.०० | २२.०० | ४२.०० |
| २ | ॲझोटोबॅक्टर | ११.०० | २२.०० | ४२.०० |
| ३ | रायझोबियम | ११.०० | २२.०० | ४२.०० |
| ४ | ॲझोस्पिरिलम | ११.०० | २२.०० | ४२.०० |
| ५ | ॲसिटोबॅक्टर | ११.०० | २२.०० | ४२.०० |
| ६ | मायकोरायझा | ४०.०० | ५०.०० | ८२.०० |

| अ.क्र. | जैविक खताचे नांव (द्रवरुप) | परिमाण (पॅकिंग साईजनिहाय दर रुपये सर्व करासहीत तालुका स्तरावर पोहोच) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | २५० मि.लि. | ५०० मि.लि. | १००० मि.लि. | ५००० मि.लि. |
| १ | पीएसबी | ४०.०० | ७३.०० | १३०.०० | ५०७.०० |
| २ | ॲझोटोबॅक्टर | ४०.०० | ७३.०० | १३०.०० | ५०७.०० |
| ३ | रायझोबियम | ४०.०० | ७३.०० | १३०.०० | ५०७.०० |
| ४ | ॲसिटोबॅक्टर | ४०.०० | ७३.०० | १३०.०० | ५०७.०० |

कृषि विभागाच्या विविध योजनांतर्गत जैविक खत पुरवठ्यासाठी कृषि आयुक्तालयातील योजना राबविणाऱ्या संबंधित कक्ष/ विभागाने त्यांच्या स्तरावरुन योजना व त्यातील घटक राबविण्याबाबत सविस्तर मार्गदर्शक सुचना निर्गमित कराव्यात.

योजनेअतंर्गत दिलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून शासन नियुक्त पुरवठादार संस्थेने योजना राबविणा-या क्षेत्रीय अधिका-यांना पुरवठा करावयाचा आहे. पुरवठयाबाबतच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे राहतील.

1. जैविक खताचा पुरवठा हा महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचेकडून करुन घ्यावयाचा आहे. वरील विक्री दर हे सर्व करासहित तालुका स्तरापर्यंत पोहोच तत्वावर निश्चित करण्यात आले आहेत.
2. कृषि विभागाच्या वैध निर्मिती/ विक्री प्राधिकारपत्र धारक प्रयोगशाळा, राज्यातील ४ कृषि विद्यापीठे व शासनाने मान्यता दिलेली कृषि विज्ञान केंद्रे यांचेमार्फत उत्पादित जैविक खते वरील दराने थेट खरेदी करता येतील.
3. पुरवठा संस्थेच्या निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी झालेल्या उत्पादकांच्या प्रस्तावाची तांत्रिक छाणनी व पडताळणी पुर्ण करण्याची जबाबदारी पुर्णपणे शासन नियुक्त पुरवठा संस्थेची राहील. आदेश देण्यापुर्वी पुरवठा करणाऱ्या उत्पादकांचे परवाना क्रमांक व वैधता तपासून घेवून उत्पादकांचे परवाना सर्व दृष्टीने वैध असल्याची खात्री केल्यानंतरच पुरवठाआदेश द्यावेत.

4. शासन नियुक्त संस्थेने पुरवठा करणा-या जैविक खत उत्पादकांकडे खत नियंत्रण आदेश १९८५ मधील तरतूदीनुसार परवाना प्राधिकारी , कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून उत्पादन व विक्री परवाना घेणे बंधनकारक आहे.

5. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांनी अनुक्रमे कृषि विभागामार्फत राबविल्या जाणा-या योजना व जिल्हा परिषदेमार्फत राबविल्या जाणा-या योजनेंतर्गत निविष्ठांची गरज निश्चित करुन विभागीय कृषि सहसंचालक यांचे समन्वयाने पुरवठा आदेश पुरवठादार संस्थेकडे तात्काळ द्यावेत. जैविक खताची मागणी व पुरवठा आदेश आवश्यकतेप्रमाणेच देण्यात यावेत. जेणेकरुन साठा कालबाह्य होणार नाही. आदेश देतांना शक्यतो जैविक द्रवरुप खतांचे सेल्फलाईफ जास्त असल्याने या खतांना प्राधान्य दयावे. तसेच पुरवठा आदेशाच्या प्रती संबंधित योजना राबविणाऱ्या संचालकांना सादर कराव्यात.

6. पुरवठा आदेश दिल्यापासून पंधरा दिवसात जैविक खतांचा पुरवठा करणे पुरवठादार संस्थेवर बंधनकारक राहील.

7. पुरवठा आदेश देतांना केवळ तांत्रिक नावानेच पुरवठा आदेश द्यावा, ब्रँडच्या नावाचा आग्रह करु नये.

8. वाहतूक व साठवणूक करतांना योग्य तापमानात वाहतुक व साठवणूक तसेच ठराविक कालावधीत वाहतूक करणेबाबत पुरवठादार संस्थेने योग्य ती दक्षता घ्यावी.

9. प्रत्येक तालुक्यात पुरवठा केल्या जाणाऱ्या प्रत्येक बॅचचे तालुकानिहाय रॅण्डम पध्दतीने त्या तालुक्यातील खत निरिक्षकाने त्वरीत नमुने घेऊन त्याची तपासणी शासकीय खत चाचणी प्रयोगशाळा किंवा कृषि विद्यापीठाकडील प्रयोगशाळांद्वारे करावी. अशा नमुन्यांचे नमूना चिठ्ठीवर **''शासकीय मोहिमांतर्गत नमुना''** असे स्पष्टपणे लिहावे. नमुना तपासणीची फी पुरवठादार संस्थेने भरणे त्यांचेवर बंधनकारक आहे. विश्लेषण अहवाल प्राप्त करुन देण्यास १० दिवसापेक्षा जास्त कालावधी लागणार नाही याची दक्षता खत चाचणी प्रयोगशाळांनी घ्यावी. विश्लेषणांतर्गत ज्या तालुक्यात ज्या बॅचचा नमुना अप्रमाणीत घोषित होईल त्या बॅचची त्या तालुक्याची देयके आदा न करण्याची दक्षता संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, उपविभागीय कृषि अधिकारी व तालुका कृषि अधिकारी यांनी घ्यावी. ती त्यांची वैयक्तिक जबाबदारी राहील. याबाबत सनियंत्रणाची जबाबदारी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांची राहील.

10. पुरवठा होणाऱ्या जैविक खताच्या बॅगवर खत नियंत्रण आदेश १९८५ मधील परिशिष्ट ३ भाग- ड (४.२) नुसार बॅगेवर लिहावयाचा मजकुर छापणे बंधनकारक राहील.

11. पुरवठादार संस्थेने निश्चित केलेल्या उत्पादक/ पुरवठादारांनी उत्पादन स्थळी उत्पादनाबाबतचे सर्व अभिलेख ठेवणे बंधनकारक आहे. तसेच प्रत्येक बॅचचा नमुना उत्पादन स्थळी तपासून त्याचे अभिलेख व काऊंटर सॅम्पल जतन करुन ठेवणे आवश्यक आहे.तसेच तपासणीच्या वेळी तपासणी अधिका-यास उपलब्धकरुन द्यावेत.

12. जैविक खत उत्पादकांनी जैविक खतांचे उत्पादन करताना आवश्यकतेनुसार नविन मदर कल्चर वापरावे, जुन्या मदर कल्चरचा वापर करु नये.

13. पुरवठादार संस्थेने पुरवठयाची देयके योजना राबविणाऱ्या संबंधित कार्यालयास विहित नमुन्यात व वेळेवर द्यावीत. त्यामध्ये उत्पादनाचा बॅच क्रमांक, उत्पादन तारीख, पुरविलेली मात्रा प्रति युनिट दर व देयकाची रक्कम याचा तपशिल असावा.

14. योजनांतर्गत राज्य/केंद्र शासनाने जैविक खतांच्या पुरवठ्याबाबत काही धोरणात्मक बदल केल्यास त्याबाबत सर्व संबंधितांना अवगत करण्याची जबाबदारी विस्तार व प्रशिक्षण, फलोत्पादन इत्यादी योजना राबविणा-या संबंधित विभागाची राहील.
15. जैविक खताचे उत्पादन व गुणवत्ता खत नियंत्रण आदेश १९८५ च्या परिशिष्ट ३ भाग अ च्या मानकाप्रमाणे राहील व त्याप्रमाणे उत्पादन व पुरवठा करण्याची जबाबदारी पुरवठादार संस्थांची राहील.

वरीलप्रमाणे सूचना व संबंधित योजना राबविणा-या कक्षाकडील सविस्तर मार्गदर्शक सुचना जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी त्यांचे स्तरावरुन अधिनस्त कार्यालयांना पाठवाव्यात. तसेच योजनांतर्गत मार्गदर्शक सूचनाबाबत क्षेत्रीय स्तरावरील अधिकाऱ्यांना/ कर्मचाऱ्यांना काही अडचणी असल्यास त्याबाबत संबंधित कक्षाशी संपर्क साधावा.

**कृषि संचालक, (निवगुनि)**
**कृषि आयुक्तालय, म. रा. पुणे-१**

---

जा.क्र.राखते/गुनि३-४/जै.खते दर/ १४८ /१४
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे -४११ ००१, दिनांक : २२ मे २०१४

**प्रति,**

1. **मा. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र कृषि उदयोग विकास महामंडळ, कृषि भवन, दिनकरराव देसाई मार्ग, आरे मिल्क कॉलनी, गोरेगांव पुर्व, मुंबई-६५**
2. **संचालक (विस्तार व प्रशिक्षण) कृषि आयुक्तालय, पुणे-५**
3. **संचालक (फलोत्पादन,) कृषि आयुक्तालय, पुणे-५**
4. **विभागीय कृषि सह संचालक, (सर्व)**
5. **मुख्य गुणवत्ता नियंत्रण अधिकारी, कृषि आयुक्तालय, म. रा. पुणे**
6. **जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)**- त्यांनी या परिपत्रकाच्या प्रती अधिनस्त सर्व उविकृअ/ताकृअ यांना त्यांच्या स्तरावरून द्याव्यात.
7. **कृषि विकास अधिकारी (सर्व)**

**प्रत - मा. प्रधान सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.**